॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572

**Public Relations Office (PRO)**

**जनसंपर्क कार्यालय**

website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215325

E-mail: pro@srtmun.ac.in

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/१८६ दि.११/१०/२०२४

## अभिनयातून मानवी अंतरात्मा व्यक्त व्हावा- कुलगुरू डॉ. मनोहर चासकर

## 'स्वारातीम' विद्यापीठात चित्रपट अभिनय अभ्यासक्रमाचा समारोप




लोकभावना, वेदना आणि आकांक्षा व्यक्त करण्याचे सामर्थ्य नटाकडे असते. उत्तम अभिनयामुळे यशाची उत्तुंग शिखरे गाठता येतात. चांगला अभिनेता हा जनतेचा सूक्ष्मनिरीक्षक असतो, अभिनयातून मानवी अंतरात्मा व्यक्त झाला पाहिजे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी 'फाउंडेशन कोर्स इन स्क्रीन ॲक्टींग' प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या समारोप प्रसंगी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (एफटीआयआय) यांच्या संयुक्त विद्यमाने ललित व प्रयोगजीवी कला संकुलामध्ये आयोजित करण्यात आलेल्या चित्रपट अभिनय प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा समारोप व पारितोषिक वितरण दि. १० ऑक्टोबर रोजी करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर उपस्थित होते. यावेळी कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे, व्यवस्थापन परिषद सदस्य इंजिनीयर नारायण चौधरी, डॉ. संतराम मुंढे, ललित व प्रयोगजीवी कला संकुलाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर, कोर्स डायरेक्टर मेघवर्ण पंत, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कुलगुरूंच्या हस्ते अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

या अभ्यासक्रमामुळे नांदेड विद्यापीठामध्ये उच्च दर्जाचे चित्रपट प्रशिक्षण उपलब्ध झाले असून, पहिल्या बॅचमध्ये सहा राज्यातील विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण प्राप्त केले आहे. सौम्या छाबरा, क्षितिज पंडित, नागेश सायबलवार या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यापीठाचे विशेष आभार मानले तसेच प्रशिक्षणामुळे अभिनय कौशल्य वृद्धिंगत झाल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अभ्यासक्रम कालावधीत करण्यात आलेल्या विविध अध्यापन व कौशल्य प्रशिक्षणाची चित्रपट दाखवण्यात आली. व्यवस्थापन परिषद सदस्य व उपस्थित मान्यवरांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

संकुलाच्यावतीने चित्रपट अभिनय प्रशिक्षणाची दुसरी बॅच डिसेंबर महिन्यात सुरू करण्यात येईल अशी घोषणा कुलगुरूंनी यावेळी केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समन्वयक प्रा.राहुल गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक व आभार डॉ. पृथ्वीराज तौर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निशिकांत गायकवाड, गजानन हंबर्डे, सचिन थोटे, सिद्धांत दिग्रसकर यांनी परिश्रम घेतले.

---